**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज**

द्वितीय अपिल क्र.रामाआ / ५६१२+६८५६+६८५७ / २०२३ / सांगली +२८७३+७९८६/ २०२४/ सांगली +३८०+३८१+१७६४+४९२४+४९२५+४९२६+४९२८+४९२७ / २०२५ / सांगली

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| विष्णू दत्तात्रय बर्वे | जन माहिती अधिकारी, १. आस्थापना विभाग, २. विद्युत विभाग, ३. प्रभाग समिती क्र.२, ४. नगर सचिव विभाग, ५. नगर रचना विभाग, ६. बांधकाम विभाग, ७. उद्यान विभाग. | प्रथम अपिलीय अधिकारी, १. आस्थापना विभाग, २. विद्युत विभाग, ३. प्रभाग समिती क्र.२, ४. नगर सचिव विभाग, ५. नगर रचना विभाग, ६. बांधकाम विभाग, ७. उद्यान विभाग. |

( सुनावणी दिनांक - १९ / ०५ / २०२६ )

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये दि. ०८.०९.२०२३ रोजी एक, दि. १६.११.२०२३ रोजी दोन, ०५.०२.२०२४ रोजी एक, दि. २९.१०.२०२४ रोजी एक, दि. २१.०१.२०२५ रोजी दोन, दि. ०५.०५.२०२५ रोजी एक, दि. २४.११.२०२५ रोजी पाच, एकुण १३ द्वितीय अपील दाखल केलेली आहेत. व्दितीय अपीले दाखल करतांना प्रयोजनामध्ये " माहिती दिली नाही, दिशाभूल करणारी माहिती दिली, सुनावणी घेतली नाही, काही प्रकरणी आदेश होऊनही माहिती दिली नाही. " अशी कारणे नमूद केली आहेत. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, प्रभाग समिती क्र.२, विद्युत विभाग, अस्थापना विभाग, नगरसचिव, मालमत्ता विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका यांचे जन माहिती अधिकारी तसेच सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका यांचे विद्यमान प्रथम

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

अपिलीय अधिकारी हजर आहेत. इतर प्राधिकरणाचे जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणी, अपीलार्थी यांनी माहिती अर्जात जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| व्दितीय अपील क्रमांक | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|---|
| ५६१२ / २०२३ | १९.०५.२०२३ | १. प्रस्तावित काळ्या यादीतील कोण कोणा ठेकेदारांना नालेसफाईची कामे दिली आहेत त्याची माहिती व इतर दोन मुद्दयांची माहिती. |
| ६८५७ / २०२३ | ०७.०६.२०२३ | मुख्य लेखाधिकारी यांच्या नावे चेक अनियमिततेबरबत मानधनावरील कर्मचाऱ्यांवर कायदेशीर जबाबदारी टाकता येते का याबाबतची माहिती. |
| ६८५६ / २०२३ | ३०.०५.२०२३ | १. माजी आयुक्तसो श्री. नितिन कापडनिस यांचा कारकिर्दित कोण कोणते कामे विना निविदा करुन कामे टेंडर काडले आहे त्याची माहिती व सोबत इतर मुद्दयांची माहिती. |
| २८७३ / २०२४ | २७.१२.२०२३ | १. महानगरपालिकेच्या प्रशासकीय कारभार सुरु झाले पासून पार पडलेल्या प्रशासकीय सर्वसाधारण सभांची विषयपत्रिका, झालेल्या चर्चेचे मिनिटस्, प्रशासकीय ठराव या सर्वांच्या खऱ्या नक्कला मिळणेबाबत. व सोबर इतर मुद्दयांची माहिती. |
| ७९८६ / २०२४ | ०८.०७.२०२४ | १. आपत्ती उपाय योजनेसाठी जागतिक बॅंकेकडे जो ४७६ कोटीचा आराखडा सादर केला आहे. त्याचे प्रारुप व इतर मुद्दयांची माहिती. |
| ३८० / २०२५ | ८.०७.२०२४ | आपत्ती उपाय योजनेसाठी जागतिक बॅंकेकडे जो ४७६ कोटीचा आराखडा सादर केला आहे. त्याचे प्रारुप व इतर मुद्दयांची माहिती. |
| ३८१ / २०२५ | ०७.१०.२०२४ | ५० लाखाच्या बिलावर शहर अभियतांच्या बोगस सह्या. |
| १७६४ / २०२५ | ०३.०२.२०२५ | महानगरपालिका ठराव क्र. २७९ मूळ ठराव व हजर असलेल्या सदस्यांची यादी मिळणेबाबत. |
| ४९२४ / २०२५ | १४.०७.२०२५ | १. सां.मि.कु. हद्दितील एकुण बाग किती आहेत याची माहिती व इतर मुद्दयांची माहिती. |
| ४९२५ / २०२५ | २३.०६.२०२५ | दि. ०६.०९.२०२३ व दि. २३.०९.२०२३ रोजीच्या पत्रावरील कार्यवाहीबाबत माहिती |

| | | |
|---|---|---|
| ४९२६ / २०२५ | १४.०२.२०२५ | क्र. न.पा/३/आर आर/३०१/०७ दि. १६.११.२००७ मा. आयुक्त व प्रादेशिक संचालक नगरपालिका प्रशासक पुणे विभाग यांच्या चौकशी अहवालात महापालिकेच्या राम मंदिरा समोरील बी.ओ.टी बांधकामाबाबत काय नमूद केले याची माहिती व इतर मुद्दयांची माहिती |
| ४९२७ / २०२५ | २३.०६.२०२५ | दि. १०.०३.२०२५ चा माहिती अर्ज दि. ०२.०६.२०२५ रोजी वर्ग केला आहे त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती. |
| ४९२८ / २०२५ | २३.०६.२०२५ | दि. १३.०५.२०२५ रोजीच्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी आयोगासमक्ष तसेच लेखी निवेदनाव्दारे खालील प्रमाणे अवगत केले.

| व्दितीय अपील क्रमांक | अपिलार्थी यांनी केलेले कथन / लेखी निवेदन |
|---|---|
| ५६१४ /२०२३ | जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. |
| ६८५७ / २०२३ | जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही उत्तर दिले नाही. |
| ६८५६ / २०२३ | खोटी माहिती दिली. |
| २८७३ / २०२४ | अर्धवट माहिती दिली. |
| ७९८६ / २०२४ | जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. |
| ३८० / २०२५ | जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. |
| ३८१ / २०२५ | जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. |
| १७६४ / २०२५ | जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. |
| ४९२४ / २०२५ | जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. |
| ४९२५ / २०२५ | जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही उत्तर दिले नाही. |
| ४९२६ / २०२५ | जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. |
| ४९२७ / २०२५ | जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. |
| ४९२८ / २०२५ | जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. |

तसेच सर्व प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाईची तसेच नुकसानभरपाईची मागणी केली आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे अवगत केले.

व्दितीय अपिल क्र. ६८५६ / २०२३ : प्रभाग समिती क्र.२, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांनी अवगत केले की, सदर प्रकरणातील माहिती अर्जास दि. ०८.०४.२०२३ रोजीच्या पत्राने उत्तर देऊन अपिलार्थी यांना वस्तुस्थिती अवगत केली आहे.

व्दितीय अपिल क्र. ३८१ / २०२५ : जन माहिती अधिकारी, उपअभियंता सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांनी अवगत केले की, सदर प्रकरणातील माहिती अर्जास उत्तर दिले नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना १५ दिवसात माहिती देण्याचा आदेश पारित केला आहे."

व्दितीय अपिल क्र. ४९२४ / २०२५ : जन माहिती अधिकारी, प्र.मुख्य उद्यान पर्यवेक्षक, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांनी अवगत केले की, "सदर प्रकरणातील माहिती अर्जास दि. २१.०७.२०२५ रोजीच्या पत्राने अपिलार्थी यांना उत्तर दिले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना मुद्दा क्र. ७ ते १४ मुद्दयांची माहिती पुनश्च देण्याचा निर्णय पारित केला."

व्दितीय अपिल क्र. ६८५७ / २०२३ : जन माहिती अधिकारी, "विद्युत विभाग सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांनी अवगत केले की, व्दितीय अपिल क्र. ६८५७ / २०२३ हे आमच्या कार्यालयशी संबंधीत नाही."

व्दितीय अपिल क्र. ४९२५ / २०२५ : जन माहिती अधिकारी, "सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांनी अवगत केले की, सदर प्ररणातील माहिती अर्जास उत्तर दिले नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना ३० दिवसात माहिती देण्याचा निर्णय पारित केला आहे."

व्दितीय अपिल क्र. ४९२६ / २०२५ : जन माहिती अधिकारी, "मालमत्ता विभाग, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांनी अवगत केले की, सदर प्रकरणातील माहिती अर्जातील माहिती निरंक आहे."

व्दितीय अपिल क्र. ४९२७ / २०२५ : जन माहिती अधिकारी, "नगर अभियंता, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांनी अवगत केले की, सदर प्रकरणातील माहिती अर्जावर कार्यवाही केली नाही. व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर काहीही कार्यवाही केली नाही."

व्दितीय अपिल क्र. ४९२८ / २०२५ जन महिती अधिकारी, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांनी अवगत केले की, सदर प्रकरणातील माहिती अर्जास माहिती दिली आहे. व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशा नंतर पुनश्च माहिती दिली आहे."

उपलब्ध अभिलेखावरुन दिसून येते की, बहुतांश व्दितीय अपील प्रकरणी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्रोटक स्वरुपाचे उत्तर देऊन माहिती देण्यास टाळाटाळ केली आहे. काही प्रकरणामध्ये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देणेबाबत आदेश पारित केला असतानाही जन



राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
सत्यमेव जयते
पुणे खंडपीठ

माहिती अधिकारी यांनी त्याची अंमलबजावणी केली नाही. काही प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर काहीही कार्यवाही केली नाही. अपिलार्थी यांना अद्यापही परिपूर्ण माहितीचे प्रदान झाले नाही. व्दितीय अपील क्र. ७९८६ / २०२४ + १७६४ / २०२५ + ३८० / २०२५ सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी काही कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार आयुक्त, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांना याप्रकरणी जनमाहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असुन त्यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थी यांच्या सर्व जोडपत्र "अ". मध्ये मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असणारी व विहीत तरतूदीनूसार देय होणारी प्रती अपिल २५ पृष्ठांपर्यंतची माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. अपिलार्थीस २५ पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करून द्यावी व त्याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

24.5.26

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ५६१२+६८५६+६८५७ /२०२३/सांगली +२८७३+७९८६/२०२४/सांगली +३८०+३८१+१७६४+४९२४+४९२५+४९२६+४९२८+४९२७ / २०२५ / सांगली / 247 / 2026

दिनांक - 1/6/2026.